**Shikshan Sanshodhan** : Journal of Arts, Humanities and Social Sciences
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal
Volume - 9, Issue - 1, January - 2026

ISSN(o): 2581-6241
Impact Factor: 9.134

DOIs:10.2018/SS/202601016 --:-- Research Paper / Article / Review

# संत तुकारामाचे अभंगातील वृक्ष विषयक प्रतिमाने

*** श्रीमती अर्चना कृष्णराव सुदामे**
संशोधक विद्यार्थी
श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर

****डॉ.सविता ज्ञानेश्वर वावगे**
संशोधक मार्गदर्शक व प्राध्यापक
मराठी विभाग
श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर
wawgesavita@gmail.com

**सारांश :** संत तुकाराम महाराजांच्या अभंगकाव्यात निसर्गप्रतिमांना, विशेषतः वृक्षविषयक प्रतिमांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्रस्तुत संशोधनात तुकारामांच्या अभंगांमधील वृक्ष, बीज, कोंब, अंकुर, रोप, खोड, पल्लव, फळ, छाया तसेच विविध वृक्षप्रकारांच्या प्रतिमांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. तुकारामांनी वृक्षसृष्टीचा उपयोग केवळ निसर्गवर्णनापुरता मर्यादित न ठेवता मानवी जीवन, भक्तीमार्ग, कर्मफळसिद्धांत, आत्मशुद्धी व ईश्वर–भक्त संबंध स्पष्ट करण्यासाठी प्रतीकात्मक पातळीवर केला आहे. बीज–वृक्ष या प्रतिमानातून सृष्टीचे चक्र, भक्त व देव यांचे परस्परसंबंध, तसेच शुद्ध कर्मांचे शुभ फलित आणि अशुद्ध कर्मांचे दुष्परिणाम त्यांनी प्रभावीपणे मांडले आहेत. कोंब, अंकुर व रोप यांच्या प्रतिमांद्वारे भक्तीतील सातत्य, साधनेचा विकास आणि आत्मिक उत्कर्ष यांचे सूचक दर्शन घडते. वृक्षाच्या छायेप्रमाणे ईश्वरकृपेचा आधार, तसेच फळ न चाखणाऱ्या वृक्षातून निःस्वार्थ सेवेचा आदर्श तुकाराम स्पष्ट करतात. चंदन, आपटा, वड, पिंपळ, तुळस, निंब, बाभूळ इत्यादी विविध वृक्षांचे संदर्भ मानवी गुण-दोषांशी जोडलेले दिसतात. अशा प्रकारे वृक्षविषयक प्रतिमांच्या माध्यमातून संत तुकाराम मानवी जीवनाला नैतिक, आध्यात्मिक व तत्त्वज्ञानात्मक दिशा देतात.

**मुख्य शब्दः** संत तुकाराम, अभंग साहित्य, वृक्षविषयक प्रतिमाने, निसर्गप्रतिमा, भक्ती तत्त्वज्ञान

## 1. प्रस्तावना

प्राचीन काळापासून काव्यामध्ये प्रतिमाने येताना दिसतात. मुळात कवीच्या अंतकरणापासून उदयाला आलेली उत्कट काव्यानुभूती कवी प्रतिमानांच्या सहाय्याने शब्द रूपात रेखाटतो त्यातून सगुण असे भाव सौंदर्य कवी साकारतो. संत ज्ञानेश्वरापासून म्हणजे तेराव्या शतकापासून मराठी काव्य विश्वात अशा प्रकारे विविध प्रतिमाने येत असल्याचे दिसून येते.

संत तुकाराम हे मुळातच निसर्गात रमणारे निसर्गातील विविध वस्तूंची तद्रूप होणारे त्यांचे सूक्ष्म निरीक्षण करणारे कवी होते निसर्गातील वृक्ष, प्राणी, ग्रह, तारे, पंचमहाभुते, नक्षत्रे अशा विविधतेचे प्रतिमाने त्यांच्या काव्यात ठिकठिकाणी त्यांच्या निसर्ग प्रेमाची साक्ष देतात.

तुकारामांच्या अभंगातील वनराई विविधतेने नटलेली आहे बिजापासून वटवृक्षापर्यंतचा प्रवास त्यांच्या काव्यात येताना दिसतो तसेच वृक्ष राजाचे विविध अवयवही जसे की पाने फुले फळे मूळ खोड शाखा यांची ही प्रतिमाने दिसतात एवढेच नाही तर विविध वृक्षांचे

प्रकार जसे की चंदन पिंपळ, वड, आपटा तुळस, निंब, रुई, बाभूळ, धोत्रा, आंबा, केळी, बोरी, ऊस, कल्पतरू, केवडा, लव्हाळी, तृण, वेळू, इत्यादी सारख्या वृक्षांचा उल्लेख येतो, तसेच निर्माल्य, चीपाटे, काटे, काष्टा यासारखी प्रतिमानेही येतात.

### बीज

मूळ सृष्टी सृजनांचे हे बीज रूप तुकारामांच्या अभंगातून साकारलेले दिसून येते मुळात वृक्षांची ही प्रथम अवस्था आहे बिजातून वृक्ष व वृक्षापासून बीज हे सृष्टीचे चक्र आहे हे सांगताना..

**तरुवर बिजापोटी । बीज तरुवरा सेवटी ।।**

**तैसे तुम्हा आम्हां जाले । एकी एक सामावले ।।**

भक्ताला देवामुळे ओळखले जाते. तो देवामुळे मान्यता पावतो पण देवालाही देवपण भक्तामुळेच येते. हा असा परस्पर सहसंबंध तरू आणि बिजाच्या माध्यमातून तुकाराम महाराज दर्शवितात. उत्पत्ती, स्थिती, लय हे सृष्टीचे चक्र सांगताना ते म्हणतात.

**बीज तो अंकुर पत्र शाखा कळेन ।**

**प्राज बीज मुळे अवध्ये नासे ।।**

तसेच भक्तीच्या विविध अवस्थेचे तसेच आहे नाम भक्तीमुळे पापक्षय होतो. पुण्य मिळते चित्तात शुद्धता येते. संतसंगतीत मन रमते. असा विस्तार होत शेवटी परमेश्वर प्राप्ती होते आणि ते झाले की मधला विस्तार नष्ट होतो. एवढेच नाही तर कर्मफळाबद्दल सांगताना तुकाराम महाराज म्हणतात की,

**शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।। (६२)**

शुद्ध बीज म्हणजे चांगल्या कर्माचे फळ ही चांगलेच मिळते तसेच पुढे दुष्कर्माचे गुण सांगताना ते म्हणतात.

**भेसळीचे बीज अमंगळगुण । उपजवी सीण दारूषणे ।।**

जसे की, जळालेले बीज वृक्ष निर्मिती करू शकत नाही. त्याप्रमाणे आपले दुष्कर्म जाळून भक्तीकडे वळण्याचा सल्ला ते देतात.

**बिजा ऐसा द्यावा उदके अंकुर ।। (२७२९)**

या ठिकाणी बीज म्हणजे संतांचे गुणधर्म तर उदक म्हणजे भक्ती आणि अंकुर म्हणजे संतत्वाचा उत्कर्ष येथे ते बीज उदक अंकुर असा प्रतिमान बंधच जणू काही सूत्रबद्ध करताना दिसून येतात.

### कोंब

बिजा नंतरची पुढची पायरी कोंब आपल्या मनातील अंतर भावना ज्याला अभावी कोमेजणाऱ्या कोंबांच्या माध्यमातून व्यक्त करताना दिसतात.

**सुकलिया कोमा अत्यंत जळधर । तेणेच प्रकार न्याय असे ।।**

**न चले पावली सांडी गरुडासन । मनाचे हो मना त्वरे ली यी ।।**

जशी जगण्यासाठी जलाची गरज तद्वतच मला जिवंत राहण्यासाठी देवाची गरज आहे असे साक्षेपी सुचकत्वाने ते व्यक्त होतात.

### अंकुर

कोंब मोठा झाला की त्याला अंकुर म्हणतात.

१. बिजाचे अंकुर दग्द होतात.
२. बिजानुसार उदक अंकुर देणे
३. अंकुर बीजात समाविष्ट असते.

अशा ठिकाणी अंकुर हे प्रतिमान तुकारामाने आपल्या अभंगात विविध ठिकाणी घेतलेले आहे.

### रोप

भक्ती भावनेचा विकास होण्यासाठी साक्षेप हा जीवनात उतरवणं गरजेचे असते जसे कि रोपाच्या वाढीसाठी जलसिंचन करणे गरजेचे असते.

**करावे कवतुक संती मायबाप ।**

**जीवन देऊनि रोपी विस्तारिजे ।।**

चांगल्या वाढीसाठी हे करावे लागते. मात्र जर का हे रोप वाळले तर पुन्हा ते अंकुरित होत नाही; त्याला कोंब येत नाही.

**सिपिले ते रोप वरीवरी बरे।**

**वाळलिया वरी कोंब न ये।।**

म्हणजे; भक्तीत सातत्य किती गरजेचे आहे, हे यावरून लक्षात येते. वृक्ष, पल्लव, शाखा, खोड याचाही उल्लेख त्यांनी केला आहे.

**तिही लोकी तुझे नाम पल्लव शाखा।**

**वेधलो वरि खोडा भाव धरूनि टेका।। (४२८)**

या अखिल जगताचे मूळ आणि खोड म्हणजे परमेश्वर आहे; म्हणजेच मुक्यालाही ते खोड म्हणतात. **वचनेही नाड । न बोले ते मुके खोड।। (७२६)**

तसेच भर उन्हाळ्यात वृक्ष पल्लवीत होतो.

**फुटती तरुवरा उष्ण काळमासी । जीवन तयासी कोण घाली ।। (२३१०)**

म्हणजे; देव सर्वांचे भरण पोषण करतो. त्यावर आपला भार घालून आपण त्याचे नामस्मरण करत निश्चित रहावे. पुढे फळाच्या संदर्भात ते म्हणतात, वृक्ष स्वतः स्वतःचे फळ चाखू शकत नाही.

**तू स्वामी मी सेवक । उंच पद नीच एक ।**

**ऐसे करावे कौतुक । नको करू खंडना ।।**

**जळ न खाती जळा । वृक्ष आपुलिया फळा ।**

**भोक्ता निराळा । तेणे गोडी निवडली ।। (९९७)**

द्वैत भावानेच खरा भक्तीचा आनंद घेता येतो, तसेच वांझ वृक्षाला वसंत ऋतूतही फळे, फुले येत नाही तसेच चित्त शुद्ध नसेल त्याला बोधाचा फायदा होत नाही. वृक्षाचे पान कालांतराने पिकते मनुष्य जीवनही वृद्धिंगत होत जाते. चांगली बुद्धी भ्रष्ट झाल्यासारखी होते व दुःखात तो मरतो. वृक्ष छायेप्रमाणे परमेश्वर कृपेची छाया हे प्रतिमानही अनेक अभंगात आलेले आहे.

**देखोनिया छाया सुख न परिजे । जव न बैसीजे तपातली ।।**

**हित तरी होय गाता अईकता । जरि राहे चित्ता दृढभाव ।। (३४२)**

वृक्ष देतो तसेच संसार दु:खाने त्रस्त झालेल्या मला देवाने त्यांच्या छायेत विसावा द्यावा मला त्यांच्या चरणापासून विलग करू नये.

**उष्णे छाये सुख वाटे । बाळे माते पान्हा फुटे ।। (९९७)**

याप्रमाणेच विविध वृक्षांच्या नामाचाही उल्लेख त्यांच्या अभंगामधून येतो. जसे की, चंदनाचे सर्वांगी उत्तम आहे.

**चंदनाचे हात पाय ही चंदन ।**
**परिसा नाही हे कोणी अंग ।।**

**किंवा**

**चंदन तो चंदनपणे । सहजगुणें संपन्न ।।**

**किंवा**

**न लगे चंदना सांगावा परिमळ ।**
**वनस्पती मेळ हाकारूनी ।।**

अशा रीतीने चंदनाचे संदर्भ त्यांच्या बऱ्याच अभंगात येताना दिसून येतात. चंदनाप्रमाणे आपटा सुवर्णाचे झाड म्हणून वंदन करतात. तसेच संवदड याचाही उल्लेख त्यांच्या

**आपटा, संवदड, रानचारा, दसऱ्याचा होय तुरा।।**

**तैसाच देवामुळे मान । नाही तरी पुसे कोण ।। (४४६९)**

तसेच पिंपळ, वड, निंब, रुईचे झाड, डोरली, बाभूळ, धोत्र्याचे झाड, आंबे, केळी, बोरी, ऊस, कल्पतरू, केवडा, तुळस, कुरदळी, वेली, लव्हाळी, तृण, वेल अशा सृष्टीतील नानाविध वनस्पतींचे प्रतिमाने त्यांच्या अभंगातून येतात.

एवढेच नाही तर काटे, चिपाटे, निर्माल्य, कास्ट, फुल, फळ यांचेही प्रतिमाने दिसून येतात. म्हणजेच वृक्षसृष्टीतील सार्वत्रिक रूपाचे प्रतिमान ने तुकाराम महाराजांच्या अभंगात शब्द रूप घेऊन साकारतात. सृष्टीचे असे विविधतेने नटलेले रूप ते प्रतिमानाच्या सहाय्याने आपल्यासमोर नुसते ठेवत नाहीत तर त्यांच्या गुणामुळे वेगळेपण ही ते सांगतात आणि त्यातून मानवी जीवनाशी त्याचा सहसंबंध कसा

आहे. हे सृष्टीकडून माणसाने काय शिकले पाहिजे. त्याचे कोणते गुणधर्म आमच्याकडे आहे आणि कोणते नाही याचा सारासार विचार करायला हवा. वृक्ष हेच माणसाचे खरे मित्र आहेत. सगे सोयरे आहेत.

**वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे ।**
**पक्षीही सुस्वरे । आळविते ।**
**येणे सुख रूचे एकांत वास ।।**

एकूणच, संत तुकारामांनी आपल्या बऱ्याच अभंगात वृक्ष विषयक प्रतिमाने वापरलेली आपणास दिसून येते.

**<u>संदर्भ ग्रंथ</u>**


1. खंदारकर, श्री. शंकर महाराज (१९९९.). श्री तुकाराम महाराज गाथा – भाष्य. पुणे : वैष्णव प्रकाशन.
2. देशपांडे, वि. वा. (२००३.). सार्थ तुकारामाची गाथा (संपूर्ण अभंग). पुणे : लोकप्रिय प्रकाशन.
3. जोशी, लक्ष्मणशास्त्री (१९८५). मराठी संतकाव्याची परंपरा. पुणे : मौज प्रकाशन गृह.
4. कुलकर्णी, प्र. ना. (१९९४) . संत साहित्य आणि तत्त्वज्ञान. औरंगाबाद : प्रतिभा प्रकाशन.
5. पाटील, भालचंद्र. (२००८). मराठी काव्यातील प्रतिमासृष्टी. कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
6. भोसले, ग. रा.(२०१०). संत तुकाराम : जीवन आणि साहित्य. मुंबई : ग्रंथाली.